# जगाचं ज्ञानपीठ
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College
Sonpeth
Dist.Parbhani
(M.S.)



संपादन

**प्रा. अशोककुमार दवणे**

■ ISBN : 978-93-85115-58-5

■ प्रकाशन क्र: ९११

Jagach Dnyanpith

Dr. Babasaheb Ambedkar

■ जगाचं ज्ञानपीठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादन :

प्रा. अशोककुमार दवणे

■ प्रकाशक :

प्रा. अशोककुमार दवणे

शब्ददान प्रकाशन

सवितानगर, तरोडा (खु), नांदेड.

मो. 9890381958.

Email : ashokkumardawane@gmail.com

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

■ सर्वाधिकार : प्रकाशकाधीन

■ प्रथमावृती : २४ ऑक्टोबर २०२३

धम्मचक्र प्रवर्तन दिन

■ मुद्रक :

रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद.

■ अक्षरजुळवणी :

श्री कॉम्प्युटर्स, कैलासनगर, नांदेड.

■ मुद्रितशोधक : चंद्रप्रकाश गायकवाड, नांदेड.

■ मुखपृष्ठ : संतोष घोंगडे, पुणे

■ किंमत : ६०० रू.

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

## अनुक्रमणिका


- अभिप्राय ........ ०९
- संपादकीय ........ ११

१. असे होते आपले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ........ १३
नानकचंद रत्तु, दिल्ली (अनुवादक: एन. एम. वाघमारे,पनवेल)

२. स्वतंत्र मजूर पक्ष आणि मुंबई विधानसभा ........ १८
न्या. आर. आर. भोळे, मुंबई (अनुवादक: प्र. श्री. नेरुरकर, मुंबई)

३. नागपूरचे धर्मांतर ........ २९
बळवंतर हणमंतराव वराळे, धारवाड (कर्नाटक)

४. भारताचा उद्धारकर्ता महात्मा ........ ३८
प्र. के. अत्रे, मुंबई

५. डॉ. आंबेडकर देशाच्या 'लाईफ लाईन' च्या सिद्धान्ताचे जनक ........ ४४
ॲड. प्रकाश आंबेडकर, मुंबई

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्कृती ........ ४८
प्रा. डॉ. यशवंत मनोहर, नागपूर

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महान ग्रंथ 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ...... ५६
प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद

८. डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन ........ ६०
डॉ. नरेंद्र जाधव, मुंबई

९. सामाजिक न्याय ........ ७३
ई. झेड. खोब्रागडे, नागपूर

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद ........ ७८
प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर

११. महाडचा रणसंग्राम: एक जग नावाचा इतिहास ............................ [illegible]
ज. वि. पवार, मुंबई

१२. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट ............ ८८
प्रा. दत्ता भगत, नांदेड

१३. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ............................ ९६
विश्वनाथ शेगावकर, अकोला

१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गोलमेज परिषदा ............................ १०२
अॅड. विश्वास काश्यप, मुंबई

१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरक्षण ............................ ११४
न्या. सुरेश घोरपडे, मलकापूर, जि. बुलडाणा

१६. भारतीय स्वातंत्र्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका ............ ११९
न्या. अनिल वैद्य, नाशिक

१७. डॉ. आंबेडकर आणि मराठा समाज ............................ १२२
प्रदीप सोळुंके, औरंगाबाद

१८. साहित्यिक:डॉ.बाबासाहेब आंबेडकर ............................ १२७
प्रा.डॉ. अशोक राणा, यवतमाळ

१९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधी............................ १३२
प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे, लाखनी, भंडारा

२०. नाशिकचा काळाराम मंदि प्रवेश सत्याग्रह ............................ १४७
प्रा. डॉ. सुरेश वाघमारे, लातूर

२१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म का सोडला? ............................ १५८
प्रा.दि. वा. बागुल, पुणे

२२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महार- मांग व परिषद ...... १७१
प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, अंबाजोगाई

२३. पीपल्स एज्युकेशन सोसायटी:इतिहास आणि सद्य:स्थिती............................ १७५
प्रा.डॉ. मनोहर जाधव, पुणे

२४. संविधाननिष्ठ राष्ट्रवाद ............................ १७९
प्रा.डॉ. अनंत राऊत, नांदेड

२५. भारताचे परराष्ट्र धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर............................ १८५
प्रा. डॉ. ह. नि. सोनकांबळे, औरंगाबाद

२६. आंबेडकर विचारधारा आणि आदिवासी क्रांतिङ्.मय ............................ १९२
प्रा. डॉ. वैजनाथ अनमुलवाड, नांदेड


Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

२७. वेटिंग फॉर व्हिजा: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परदेश अनुभवांचा .... २०२
प्रा. डॉ. विपुल जागभाये, सोनपेठ,गंगाखेड

२८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जात निर्मूलनासंबंधी विचार कार्य ....... २१०
प्रा. डॉ. मारोती कसाब, अहमदपूर, जि. लातूर

२९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता व आंबेडकरी वृत्तपत्रसृष्टी ..... २१५
प्रा. डॉ. अशोक कांबळे, यवतमाळ

३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्मातील मानवतावादाचे .......... २२१
प्रा. डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे, धर्माबाद, जि.नांदेड

३१. ग्रंथप्रेमी: डॉ. बाबासाहेब आंबेडकर.................................. [illegible]
प्रा. डॉ. भास्कर पाटील, अकोला

३२. कलासक्त: डॉ. बाबासाहेब आंबेडकर .................................. [illegible]
प्रा. डॉ. अशोक इंगळे, अकोला

३३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाली भाषेतील योगदान ...................... २४६
प्रा. उषा काळे, पुणे

३४. मानवी स्वातंत्र्याचे महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर.................. २५४
प्रा.डॉ. राजेंद्र गोणारकर, नांदेड

३५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांतरचना ...................... २५७
प्रा. डॉ. संतोष हंकारे, राणीसावरगाव, ता.गंगाखेड

३६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलितेतर सहकारी............................ २६६
सुधाकर लोमटे, उमरखेड

३७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गोपाळबाबा वलंगकर ...................... २७४
डॉ. प्रेम हनवते, बार्टी, पुणे

३८. संत साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर .............................. २७९
प्रा. डॉ. गजानन लोहवे, यवतमाळ

३९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू कोड बिल आणि भारतीय स्त्री......... २८५
प्राचार्या अस्मिता दारुंडे- भगत, हिंगणघाट, जि. वर्धा

४०. कृष्णाजी केळुसकर गुरुजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ................. २९७
प्रा. डॉ. राज ताडेराव, फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग

४१. इतिहासकार: डॉ. बाबासाहेब आंबेडकर ..................................... ३०३
प्रा. डॉ. संतोष बनसोड, बडनेरा, जि. अमरावती

४२. भारतीय रिपब्लिकन पक्ष ..................................................... ३०७
प्रा. डॉ. कोंडबा हाटकर, औरंगाबाद

Late. Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

## २७ वेटिंग फॉर विजा: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खडतर अनुभवांचा जिवंत दस्तावेज

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
सोनपेठ, गंगाखेड

### प्रस्तावना

जगात अत्यल्प धुरिणांनी आपापल्या भाषेत आत्मचरित्र लिहिण्याचे धाडस केले आहे. आत्मचरित्र हा मोठा गुंतागुंतीचा आणि अनेक प्रश्न उपस्थित करणारा वाङ्मयप्रकार म्हणून चर्चिला गेला आहे. अगदी विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आत्मचरित्र लेखनाला वाङ्मय म्हणून गृहीत धरले जात नव्हते. तसे पाहिले तर कोणताही वाङ्मयप्रकार लेखकाच्या जीवनाचाच एक अविभाज्य भाग असतो. लेखक आपले बरे-वाईट अनुभव कविता, कथा, कादंबरी किंवा नाटकाच्या माध्यमातून जीवन चित्रित करताना त्यात त्याच्या जीवनातील प्रसंगांना स्थान देतच असतो. असे असले तरी आत्मचरित्र हा विशेष लेखनप्रकार अठराव्या शतकात पाश्चिमात्य देशात प्रचलित झाला. अगोदर तीकडे चरित्रलेखन सुरुवात झाले. त्यानंतर ऑगस्टीन आणि रुसोंनी कन्फेशन म्हणजेच जीवनातील महत्त्वपूर्ण बाबींची कबुली देताना कुठेही जीवनातील सत्य लपवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे पुढे ते प्रमाण आत्मचरित्र म्हणूनच ओळखले जाऊ लागले. त्यानंतर कालौघात पाश्चिमात्य देशात एकोणीस आणि विसाव्या शतकात डिकन्स, ट्रोलोप, मिल आणि अन्य काही समकालीन लेखकांनी आपले जीवन लिहिण्याचा प्रयत्न केला. त्याला त्यांनी 'मेमॉर' म्हणजेच 'संस्मरण' असे नाव दिले. हळूहळू या लेखनाचा प्रभाव पुढील काळात झिरपतांना जगात चरित्र-आत्मचरित्र लेखकांची चर्चा सुरू झाली.

प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे भारतातील लेखक-कवी आपल्या जीवनातील प्रसंग लिहू लागले, त्याला शीर्षक मात्र त्यांनी वेगवेगळे दिले. त्यात सतराव्या शतकात बनारसीदास यांनी 'अर्धकथानक' नावाने ब्रज भाषेत आत्मचरित्र लिहिलेले आढळते. त्यानंतर पुढील शतकात चरित्र-आत्मचरित्र या क्षेत्रात उल्लेखनीय ग्रंथलेखन आढळून येत नाही. एकोणिसाव्या शतकात रासुंदरी देवींनी 'अमर जीबन' नावाचे बंगाली भाषेत आत्मचरित्र प्रकाशित केले. त्यानंतर भारतीय विद्वान जगातील विविध देशांत जाऊन उच्च शिक्षण घेऊन भारतात येऊ लागले. फ्रेंच राज्यक्रांती आणि त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी मूल्ये भारतीयांना कळू लागली. एकोणिसाव्या शतकात भारतीयांना स्वातंत्र्याची चाहूल लागली होती. त्यातूनच १८५७ चा अयशस्वी उठाव झाला. आता मात्र भारतीयांना प्रकर्षाने स्वातंत्र्याची गरज भासू लागली. या काळात भारतात स्वातंत्र्य चळवळ रुजायला प्रारंभ झाला. हाच भारताचा 'रेनेसांस' म्हणजेच 'पुनरुज्जीवनाचा कालखंड' म्हणून

ओळखला जातो. विसाव्या शतकात भारतीय स्वातंत्र्य चळवळीने वेग घेतला. देशभरातून 'इंग्रजांनी भारत देश सोडून जावे, इथली व्यवस्था भारतीयांच्या हाती सोपवावी, आम्हाला स्वातंत्र्य द्यावे 'याची मागणी जोर धरू लागली. नेताजी सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आदींनी विविध स्तरांवर स्वातंत्र्यासाठी चळवळी सुरु केल्या. त्यात 'जहाल' आणि 'मवाळ' असे दोन गट पडले.

इ.स. १९२० साली टिळकांचे दुर्दैवी निधन झाले. त्यानंतर स्वातंत्र्याची सर्व सूत्रे महात्मा गांधी यांच्याकडे आली. त्यात जहालवाद्यांचे कार्य सुरूच होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'आझाद हिंद फौजे' ची स्थापना करून इंग्रजांना आव्हान द्यायचे ठरवले. दुसरीकडे, भारतीय युवकांनी इंग्रजांना 'जशास तसे' उत्तर द्यायचे ठरवले. यातूनच दुर्दैवाने भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी सुनावली गेली. याच काळात इंग्रज सत्तेविरुद्ध दिलेला लढा नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'ॲन इंडियन पिलग्रिमः अनफीनिशड ऑटोबायोग्राफी' शीर्षकात आपले आत्मचरित्र लिहिलेले आढळते. त्याच काळात फाशीची शिक्षा झाल्यानंतर तुरुंगात स्वातंत्र्यवीर भगत सिंग यांनी 'व्हाय आय एम अथेईस्ट' नावाने आपले आत्मचरित्र लिहिले. हे दोन्ही आत्मचरित्र हिंदी आणि इंग्रजी भाषेत लिहिली गेली. नेताजी आणि भगत सिंग यांची दोन्ही आत्मचरित्रे या नव्या लेखन क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे आढळून येते. तिकडे पश्चिमेत आणि उर्वरित जगभरात आत्मचरित्र हा लेखनप्रकार बऱ्यापैकी नावारूपाला येत होता.

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

### 'वेटिंग फॉर विजा' पार्श्वभूमी

याच काळात अवघे बावीस वर्षे वय असताना बाबासाहेब आंबेडकरांना बडोदा संस्थानाने परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली. त्यात बाबासाहेब आंबेडकर कोलंबिया विद्यापीठ, न्यूयॉर्क, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लंडन विद्यापीठ आदि ठिकाणी विविध स्तरांवरील एम.ए., पीएच.डी., एम.एस्सी., डॉक्टर ऑफ सायन्स आदि कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र विषयात उच्च शिक्षण-संशोधन पूर्ण करून भारतात आले. भारतात आल्याबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर बडोदा संस्थानात झालेल्या कराराप्रमाणे रुजू झाले. वर्णव्यवस्था, स्पृशास्पृश्यता इत्यादी संदर्भाने डॉ. आंबेडकरांना मागील इतिहास साक्षी होता. परदेशातून उच्च शिक्षण घेऊन आल्यानंतर बडोदा संस्थानात रुजू झाल्यावरसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जात-वर्णव्यवस्थेवरून अत्यंत खडतर अनुभव आले. अवघ्या तीन दिवसात त्यांना राहते घर सोडावे लागले. त्यांना बडोदा संस्थानचे घर मिळाले नाही. आपला सगळा पसारा घेऊन त्यांना अक्षरशः रस्त्याच्या कडेला थांबावे लागले. प्रचंड मानसिक व्यथा-वेदना घेऊन पुढील नोकरी न करता दुर्दैवाने बाबासाहेबांना मुंबईला परतावे लागले. याच अनुषंगाने लहानपणीच्या आणि नंतरच्या काही हृदयद्रावक, जिवंत अनुभवांचे सहा प्रकरणांत 'वेटिंग फॉर विजा' शीर्षकाने आत्मचरित्र लिहिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भाषाप्रभू होते. इंग्रजी आणि मराठी भाषेच्या वाङ्मयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महत्त्वपूर्ण योगदान दुर्लक्षून चालणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील इंग्रजी, हिंदी, पाली, संस्कृत, फ्रेंच, जर्मन, मराठी, पर्शियन, गुजराती इत्यादी नऊ महत्त्वपूर्ण भाषेवर प्रभुत्व मिळवले होते. दहा हजारांपेक्षा जास्त इंग्रजी शब्दसंग्रह,अनेक उच्च पदव्या घेऊन परदेशावरून शिकून आलेले डॉ. बाबासाहेब मात्र इथे भारतात उपेक्षेचे चटके झेलत होते. त्यांनी सोसलेल्या प्रचंड अवहेलना, त्रास त्यांनी आपल्या वीस पानांच्या 'वेटिंग फॉर विजा' या आत्मचरित्रात सहज समजेल अशा भाषेत चित्रित केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे आत्मचरित्र कोलंबिया विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला लागू केले. तोपर्यंत इकडे भारतात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मचरित्र आहे असे भारतातील विद्यापीठांतील अभ्यासमंडळ सदस्यांना माहितीसुद्धा नव्हते. आत्तापर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध ग्रंथांवर अनेकांनी आपले संशोधन लिहिले आहे. तसेच प्रकाशित अनेक संशोधनग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, स्वातंत्र्यविषयक, अस्पृश्य लढा, वृत्तपत्र, फाळणी, दलित उद्धार, बुद्ध धम्म, स्त्री मुक्ती, हिंदूकोड बिल, संसदीय लोकशाही, राज्यघटना, न्याय, नियोजन, शेती आदि संदर्भाने अनेकांनी लिहिले आहे. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र मात्र दुर्लक्षित राहिले गेले. त्यावर म्हणावे तेवढे लेखन आणि संशोधन झाले नाही. इथेही बाबासाहेबांना उपेक्षा सहन करावी लागली.

## 'वेटिंग फॉर विजा' प्रस्तावना

'वेटिंग फॉर विजा' हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले छोटेखानी आत्मचरित्र आहे. हे आत्मचरित्र मूलत: इंग्रजी भाषेत लिहिले आहे. अलीकडच्या काळात मराठीत 'माझी आत्मकथा', 'आठवणीतील अश्रू', आणि हिंदीत 'विसा की प्रतीक्षामें' इत्यादी अनुवाद झालेले आहेत. डॉ.आंबेडकरांनी हे आत्मचरित्र एकूण सहा भागात लिहिले आहे. बाबासाहेबांचे हे आत्मचरित्र मोठे मजेशीर आहे. जगात आत्तापर्यंत अनेक आत्मचरित्र लिहिली गेली आहेत. त्यातही भारतात पंडित जवाहरलाल नेहरू, शरद पवार, यशवंतराव चव्हाण आदि राजकारणी मंडळींनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यात विशेषत: महात्मा गांधी यांचे 'माझे सत्याचे प्रयोग' हे जगभर मान्यता पावलेले उत्कृष्ट आत्मचरित्र आहे. याचे कारण म्हणजे, महात्मा गांधीनी त्यात आपले दोषसुद्धा उजागर केले आहेत. आत्मचरित्र लेखनासंदर्भात नेहमीच 'सत्य की काल्पनिक कथा ?' असा प्रश्न उपस्थित केला जातो. याचे कारण म्हणजे माणूस आपल्या जीवनातील संपूर्ण सत्य जगाला कथन करूच शकत नाही अशी धारणा आहे. आपल्या जीवनात शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक स्तरांवर अनेक बदल घडत असतात. याच धर्तीवर महात्मा गांधीजींचे आत्मचरित्र कसोटीवर उतरताना दिसते. असा सगळीकडे आत्मचरित्राविषयी ऊहापोह चाललेला

Late Ramrao Narpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

असताना डॉ.आंबेडकरांचे हे छोटेखानी आत्मचरित्र अभ्यासकांकडून दुर्लक्षित राहिले. या छोटेखाणी आत्मचरित्रात खूप मोठ्या बाबी दडलेल्या आहेत. बाबासाहेबांनी आपला संपूर्ण जीवनपट लोकांसमोर आणला नाही. आपल्या क्रांतिकारी कार्यातून त्यांना आत्मचरीत्रासाठी वेळच मिळाला नाही. वंचित–उपेक्षित–शोषित–पीडीत लोकांचे जीवन सुधारणे, त्यांचे चरित्र आणि चारित्र्य सांभाळणे त्यांना महत्त्वपूर्ण वाटले. त्यांच्यासाठी बाबासाहेब अहोरात्र झगडले. परिणामी आपल्या जीवनातील संपूर्ण व्यथा–कथा–वेदनांचा ऊहापोह करणे त्यांना जमले नसावे किंवा त्याला त्यांनी एवढे महत्त्वाचे मानले नसावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खरंच संपूर्ण आत्मचरित्र लिहिले असते तर त्याचे अनेक खंडात प्रकाशन करावे लागले असते, परंतु एवढे लिहायला आणि प्रकाशित करायला त्यांना वेळच नव्हता. त्यांच्या कुण्यातरी एका मित्राने त्यांना आत्मचरित्र किंवा तत्सम काहीतरी लिहावे अशी विनंती केली असावी आणि त्या अनुषंगाने त्यांनी हे छोटेखानी परंतु तत्कालीन भारतातील सामाजिक, राजकीय व्यवस्थेची चिरफाड करणारे ते महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरले आहे.

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

## 'वेटिंग फॉर विजा' शीर्षक का ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्मचरित्राचे नाव मोठे मजेशीर आहे. त्यांनी 'वेटिंग फॉर विजा' असे शीर्षक का दिले असेल ? असा अनेकांना प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याची अनेक कारणे सांगता येतील. या आत्मचरित्राच्या सुरुवातीलाच डॉ.आंबेडकर स्वत:च लिहितात की, परदेशी लोकांना भारतातील सामाजिक अवस्था माहिती नाही. वर्ण व्यवस्था, जातिभेद, स्पृशास्पृश्यता इत्यादी अमानुष बाबींची सर्वांना माहिती व्हावी त्यामुळे याला इंग्रजी शीर्षक दिले. या संदर्भाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या चरित्राच्या प्रस्तावनेत लिहितात, "The problem is how best to give an idea of the way the untouchables are treated by the caste Hindu. A general description or a record of cases and of the treatment accorded to them are the two methods by which this purpose could be achieved. I have felt the latter would be more effective than the former. In choosing these illustrations I have drawn partly upon my experience and partly upon the experience of others. I begin with that have happened to me in my own life." अस्पृश्यतेसंदर्भात सुरुवातीला स्वत:चे जळजळीत अनुभव आणि शेवटी बाहेरील व्यक्तींची उदाहरणे देऊन जगाला भारतातील सत्य परिस्थिती कथन केली आहे. प्रस्तुत आत्मचरित्रात बाबासाहेबांनी प्रारंभी आणि शीर्षकातून आपली भूमिका उघड केली आहे.

'विजा' म्हणजे एखाद्या परकीय, परदेशी व्यक्तीला दुसऱ्या देशामध्ये काही दिवस राहायला तात्पुरती परवानगी देणे होय. त्याची तारीख संपण्याअगोदर त्याने लागणारी रक्कम भरून तो पुनर्जीवित करावा किंवा तो देश सोडून जावे. असे न केल्यास त्याला देशद्रोही ठरवून त्याच्यावर खटला भरला जातो. त्याला तात्काळ तुरुंगात टाकले जाते.

इथे डॉ.आंबेडकर तर भारतीय होते. त्यांना त्यांच्याच देशात 'विसा' म्हणजे परवाना परवानगी काढण्याची गरज काय ? त्यांच्याच देशात विसाच्या प्रतीक्षेत थांबण्याची परवानगी घेण्याची गरज कशी काय पडली ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुद्दे मनापासून वाचकांनी हा विचार करण्यासाठी त्यांनी आपल्या आत्मचरित्राला जाणीवपूर्वक हे शीर्षक दिले. भारतातील अमानवी समाजव्यवस्था जगाला माहिती करून द्यायची होती. समानतेची मूलगामी संकल्पना रुजवणाऱ्या भारत देशामध्ये कसे पावलोपावली वर्णव्यवस्थेचे स्तंभ 'आ' वासून उभे आहेत ( ? ) हे जगाला दाखवून द्यायचे होते. दीन-दलित, गोर-गरीब अदिवासी, डोंगरखोऱ्यात राहणारी माणसे प्राण्यापेक्षाही बत्तर जीवन कंठीत होती. उलट तथाकथित उच्चवर्णीय आणि श्रीमंतांनी भारतातील 'वसुधैव कुटुंबकम' ही मूळ संकल्पना रसातळाला घातली होती. मूलनिवासी लोकांना निराश्रित म्हणून घोषित केले गेले. आपल्याच घरात, गावात आणि देशात इथला मूलनिवासी परका बनवला गेला. त्याच्यावर डाकू, चोर, दरोडेखोर जमात म्हणून शिक्कामोर्तब केले गेले. परिणामी त्याला उपद्रवी-अस्पृश्य म्हणून घोषित केले. त्याला गावाबाहेर हाकलून दिले गेले. मालकालाच गुलाम बनवण्यात आले. प्रस्थापित एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी त्याच्या तोंडाला मडके, पाठीला झाडू बांधून परकीय नागरिकांपेक्षाही त्याची दुर्दैवी अवस्था केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे केवळ जवळून पाहिलेच नव्हते तर त्याचे घाव त्यांच्या मनात खोलवर रुजले होते. त्यासाठी त्यांनी हे शीर्षक दिले. आपल्या देशात राहून माणसं आपल्याच माणसांना परकीयच काय प्राण्यापेक्षाही वाईट वागणूक देतात. माणसाला माणूस म्हणून सन्मान, वागणूक दिली जात नव्हती. त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक हे शीर्षक दिले. माझ्याच देशात मी परकीय नागरिकांपेक्षाही कसा परका झालो ( ? ) याची जाण आणि [illegible] आणून देण्यासाठी त्यांनी आपल्या आत्मचरित्राला हे शीर्षक दिले.

Late. Ramesh Warpudkar Arts, Commerce & Sc... Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

## मुलांचा जीवघेणा कोरेगाव प्रवास

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आत्मचरित्रात काही मोजक्याच परंतु अत्यंत गंभीर, जिवंत बाबींची नोंद केलेली आढळून येते. लिहायला बसल्यानंतर सहज, पटकन आणि मनात खोलवर रुजलेल्या आठवणींची नोंद बाबासाहेबांनी आपल्या चरित्रात केली आहे. त्यातील एकदम बालवयातील एक हृदयद्रावक अनुभव त्यांनी आपल्या चरित्रात चित्रित केला आहे. साधारणत: ही १९०१ या वर्षातील घटना आहे. त्यावेळी बाबासाहेब दहा वर्षांचे होते. त्यांच्या मातोश्री सौ.भीमाबाई सकपाळ यांचे १८९६ साली निधन झाल्यामुळे त्यांना त्यांच्या आत्या मीराबाईंनी सांभाळले. १९०४ पर्यंत रामजींचे कुटुंब दापोली (रत्नागिरी) येथून साताऱ्याला स्थलांतरित झाले होते. त्यावेळी श्री रामजी सकपाळ हे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कोरेगाव येथे बॉम्बे प्रेसिडेंसी अंतर्गत कॅशिअरची सेवा बजावत होते.

प्रस्तुत प्रकरणात डॉ. बाबासाहेबांना आपल्या बालपणी अस्पृश्यतेचे कसे चटके

बसले ? याचे जिवंत चित्रण रेखाटले आहे. पहिल्या प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या बालपणीच्या भयंकर अनुभवाची आठवण केली आहे. त्यांना आणि त्यांच्या भावंडांना कोणत्याही प्रकारची मदत नाकारण्यात आली. कारण ते 'अस्पृश्य' जातीचे असल्याच्या कारणावरून वेगळ्या गावात असलेल्या त्यांच्या वडिलांना भेटायला गेले होते. लेखकाला त्याच्या शाळेतील दलित मुलांसाठी निर्देशित केलेल्या असहिष्णुता आणि भेदभावपूर्ण प्रथा आठवतात, ज्याने त्याच्या मनावर खोलवर छाप सोडली.

बाबासाहेबांच्या कुटुंबीयांसोबत हिंदू समाज त्यांच्या जन्मगावी, सातारा येथे दुर्लक्षित, तुच्छतेने आणि तिरस्काराने वागला याची नोंद इथे दिसून येते. बाबासाहेब केवळ दहा वर्षांचे असताना, अशा प्रचंड क्रौर्याने आणि उपहासाने तत्कालीन समाजाचा खोटारडा चेहरा आपल्यासमोर येतो.

## परदेशातून उच्च शिक्षित, बडोद्यात निराश्रित

दुसरे प्रकरण त्याहीपेक्षा भयंकर आहे. यात बाबासाहेब परदेशातून उच्च शिक्षण घेऊन आले आहेत. आता ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. बडोदा संस्थानात नोकरी करण्यासाठीं ते बडोदा शहरात दाखल होतात. ते महार अस्पृश्य जातीचे असल्यामुळे त्यांना संपूर्ण बडोद्यात राहायला खोली देखील मिळत नाही. उच्च शिक्षित, परदेशातून शिकून आलेले मित्र देखील डॉ. आंबेडकरांना आपल्या घरी एक दिवस रहायला जागा देत नाहीत. शेवटी एका जुनाट पारसी हॉटेलमध्ये नाव बदलून डॉ.बाबासाहेब आंबेडकर राहतात. तिथेही पारसी लोकांना हा अस्पृश्य महार जातीचा माणूस नाव बदलून आपल्या जातीच्या हॉटेलमध्ये राहतो हे कळल्याबरोबर दहा–बारा माणसे लाठ्याकाठ्या घेऊन बाबासाहेबांना मारण्यासाठी हॉटेलवर येतात. बाबासाहेब तात्काळ माफी मागून स्वतःचा जीव वाचवतात. सायंकाळी सामान उचलून रेल्वेस्टेशनवर पाच तास थांबतात. स्वतःचे सामान स्वतःलाच घेऊन जावे लागते. परदेशातून उच्च शिक्षण घेऊन आलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर अक्षरशः रस्त्यावर थांबतात. कुठेही राहायची व्यवस्था होत नसल्यामुळे शेवटी ते परत मुंबईला निघून जातात. एका अस्पृश्य समाजातील परदेशातून उच्च शिक्षित तरुणाला भारतात पारसी, मित्र आणि सामान्य माणसंसुद्धा अमानुष वागणूक देतात. हे पाहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यथित होतात आणि लिहितात, "This scene of a dozen Parsis armed with sticks lined before me in a menacing mood, and myself standing before them with a terrified look imploring for mercy, is a scene which so long a period as eighteen years has not succeeded in fading away. I can even now vividly recall it-and [I] never recall it without tears in my eyes. It was then for the first time that I learnt that a person who is an untouchable to a hindu is also an untouchanle to a Parsi". ''एक अस्पृश्य, मग हिंदूंना किंवा पारसी लोकांना, सर्वांनाच अस्पृश्य असतो. हे आठवून माझ्या डोळ्यात आजही पाणी आल्याशिवाय राहात नाही.

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

## अभिमान, संकोच आणि अपघात

इ.स. १९२९ मध्ये चाळीसगाव–धुळे येथील दलित समाजातील लोकांना सामाजिक बहिष्कार म्हणजेच वाळीत टाकणे, अन्याय, अत्याचार या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका चौकशी समितीमध्ये जातात त्या वेळचा प्रसंग आहे. चौकशी आल्यानंतर डॉ.आंबेडकर चाळीसगावला उतरतात. तिथे त्यांना मोठा जनसमुदाय महारवाड्यात (दलित वस्ती) घेऊन जायचा आग्रह धरतात. इथेही डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महार या अस्पृश्य जातीचे असल्यामुळे टांगेवाला टांगा चालवायला तयार नव्हता. त्यांच्यापैकी एकाने टांगा चालवला आणि अरुंद पुलावरून जाताना टांगा पलटी झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर खाली पडले. त्यांच्या डोक्याला मार लागला, पाय मोडला आणि बाबासाहेब काही तासांसाठी बेहोश झाले. संपूर्ण समाज एकदम अस्वस्थ झाला. एक टांगेवाला तयार न झाल्यामुळे बाबासाहेबांचा जीव धोक्यात आला. यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "It is then I learnt that a Hindu tongawalla, no better than a menial, has a digity by which he can look upon himself as a Barristar-at-law." परदेशातून बॅरिस्टर–एट–लॉ सारखी उच्च पदवी घेऊन आलेला एक उच्च शिक्षित तरुण, एका हिंदू टांगेवाल्याला त्याच्या धर्मापेक्षा कनिष्ठ–अस्पृश वाटणे यापेक्षा भारताची शोकांतिका काय असावी ?

## दौलताबाद किल्ल्यावरील पाणी बाटले

या प्रकरणात इ.स.१९३४ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे मित्र नाशिक–औरंगाबादला सहलीला जातानाचा भयंकर प्रसंग कथन करतात. त्यावेळी मुस्लीम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरु होता. मराठवाड्यात निजाम राजवट होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मित्रमंडळी वेरूळला जाताना वाटेत दौलताबाद किल्ल्याला भेट देताना त्यांनी किल्ल्याच्या दरवाजासमोरील हौदातील पाण्याने हात–पाय धुतले. त्यांना तेथील चोपदाराने जात विचारली. त्यांनी आम्ही 'महार' जातीचे आहोत असे सांगितल्या-बरोबर तेथील सर्वच मुसलमान त्यांच्यावर मारायला धावून आले. ''धेड माजलेत. यांना चांगलाच धडा शिकवायला पाहिजे. यांनी आमचे पाणी बाटवले!'' असे म्हणून बाबासाहेब आणि सर्वच मित्रांना घाण घाण शिव्या दिल्या. त्यावर, ''अस्पृश्यांना पाणी नाकारणे हे इस्लामला मान्य आहे का ?'' असा बाबासाहेबांनी रागाने प्रतिप्रश्न केला. त्यानंतर सर्व मुस्लीम शांत झाले. त्यांतर त्यांनी किल्ल्यात जाऊन संपूर्ण निरीक्षण केले. हा प्रसंग बाबासाहेबांना मुळासकट हलवून गेला. त्यानंतर ते लिहितात, "I gave one instance to show that a person who is an untouchable to a Hindu is also an untouchanle to a Parsi. This will show that person who is untouchable to a Hindu is also an untouchable to a Mohammedan". ''एक अस्पृश हा हिंदू, पारसी आणि मुस्लिमांनासुद्धा अस्पृश्य असतो.''

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**अस्पृश्य स्त्रीचा उपचाराविना दुर्दैवी मृत्यू**

हे प्रकरण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वत:च्या जीवनाशी निगडित नसले तरी त्यांनी काही महत्त्वपूर्ण प्रसंगांची नोंद इथे केली आहे. इ.स. १९२९ साली महात्मा गांधीजींच्या 'यंग इंडिया या वर्तमानपत्रात प्रकाशित आलेल्या पत्रात, ''एका हिंदू डॉक्टरने एका अस्पृश्य शिक्षकाची पत्नी जी एक स्त्री अस्पृश्य आहे म्हणून तिला तिच्या बाळंतपण काळात योग्य उपचार न केल्यामुळे ती मरण पावली.'' असे सांगायला तो अस्पृश्य शिक्षक घाबरला. किती भयंकर आहे हे सर्वच! उच्च शिक्षित असलेला डॉक्टर आपला सेवा परमोधर्म सोडून अस्पृश्य म्हणून एका स्त्रीवर उपचार करत नाही. "As a result of thie refusal to treat her, the woman died. He felt no qualms of conscience in setting aside the code of conduct which is binding on his profession. The Hindu would prefer to be inhuman rather than touch an Untouchable." एका अस्पृश्य स्त्रीला स्पर्श करण्यापेक्षा एका हिंदू व्यक्तीला आपला धर्म श्रेष्ठ वाटतो, त्यातून तो असे अमानवी वागतो. यापेक्षा उच्च शिक्षणाचे दुर्दैव ते काय असायला हवे ?''

**तरुण भंगी अस्पृश्य तलाठी पळून जातो**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्मचरित्रातील हे शेवटचे प्रकरण अत्यंत बोलके आहे. हे ही डॉ.आंबेडकरांच्या जीवनाशी निगडित प्रकरण नाही. यात खेडा जिल्ह्यातील बोरसाड तालुक्यात एक भंगी अस्पृश्य जातीचा तरुण तलाठी म्हणून रुजू होतो. तेथील लोकांना हा तलाठी लामा हरिजन या मागास जातीचा आहे असे कळल्याबरोबर त्याला प्यायला पाणी देत नाहीत, त्याला कार्यालयात बसू दिले जात नाही. ''तू भंगी जातीचा आहेस. घाण साफ करणे तुझे मूळ काम आहे. तू खुर्चीवर बसू नको.'' असे म्हणून तेथील स्थानिक लोक, पाटील आणि कारकून त्याला धमकावून गावातून पळवून लावतात. त्यात तो राजीनामा द्यायला तयार होतो. लवकर गाव सोडत नाही म्हणून संपूर्ण गाव त्याला मारायला येतो. त्यातून तो रजा देऊन जातो आणि स्वत:ची सुटका करून घेतो.

**संदर्भ**

Ambedkar, B.R. "Waiting for a Visa." Dr. Babasaheb Ambedkar: Speeches and Writings, vol. 12, edited by Vasant Moon, Dr. Ambedkar Foundation, 2014, pp.661-691.

■ ■ ■

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani